अहवाल  दिनांक २२/११/२०१८

**डॉ.एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कामर्स,पवनी येथे उदयोजकता आणि स्वयंरोजगार यावर मार्गदर्शन व प्रशिक्षणाचे आयोजन :—**

पवनी:— स्थानिक डॉ.एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, पवनी येथे करिअर गायडन्स आणि IQAC सेल च्या वतीने एकदिवशीय उदयोजकता व स्वयंरोजगार या विषयावर मार्गदर्शन व प्रशिक्षणाचे आयोजन दि. २२/११/२०१८ ला करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. संजय नंदागवळी, प्रमुख मार्गदर्शक मा. श्रीकांत शहारे, दशरथ धुर्वे भिमशक्ती एकसंघ बहुउद्देशीय प्रशिक्षण संस्था पवनी हे होते.

प्रमुख मार्गदर्शक मा. श्रीकांत शहारे यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी नौकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगारातून रोजगाराच्या संधी प्राप्त होउ शकतात.सर्टीफीकेट ऑफ फॅशन डिझाइनिंग, बेसिक कंम्पुटर,इंग्लीश स्पीकींग कोर्स यावर मार्गदर्शन केले.तसेच याच रोजगाराच्या माध्यमातून स्वत:चे जीवनमान उंचविता येते असे मत व्यक्त केले. तसेच या प्रशिक्षणामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच दुसरे वक्ते मा. दशरथ धूर्वे अध्यक्ष,भिमशक्ती एकसंघ बहुउद्देशीय प्रशिक्षण संस्था पवनीयांनी कृषी क्षेत्राचे महत्व त्यात आणा—या रोजगारांच्या संधी त्यातून घडून येण्यास विकास यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. संजय नंदागवळी यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून येणा—या काळात स्त्रीयांना विविध समस्यांना समोरा समोर जाण्याची वेळ येउ शकते त्यासठी मुलींमध्ये कुठलीतरी कला अवगत आणे गरजेचे आहे. त्यासाठीच अश्या कार्यक्रमाच आयेजन करण्यात येते. असे अध्यक्षीय मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मध्ये मा. प्रा. सिंगाडे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकेतून आजच्या काळात विद्यार्थ्यांसाठी स्वयंरोजगार किती महत्वाचे आहे हे पटवून दिले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. विलास मेश्राम तर आभार धर्मेंद्र पडोळे यांनी मानले या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित प्रा. गजभिये, प्रा. वाहाणे, प्रा.जाधव, प्रा. जांगळे, प्रा. बनकर हे होते.

Principal
Dr. L.D. Balkhande
College of Arts and Comm
Pauni, Dist. Bhandara

Scanned by CamScanner

भीमशक्ती एकसंघ बहुउद्देशीय प्रशिक्षण संस्था पवनी

कृषी मार्गदर्शनपर कार्यशाळा

दिनांक - २२-११-२०१८




मा. दशरथ धुर्वे स्वयंरोजगारी आणि कृषीविकासावर मार्गदर्शन करतांना

Scanned by CamScanner